**प्रेसनोट** **दि.०१/०८/२०१९**

## शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे शहर

## मेडीकल हाऊस या बंद दुकानाला लागलेली आग तात्काळ विझवल्याने मोठी दुर्घटना टळली

दि. ३१/०७/२०१९ रोजी २१/०० वा ते दरम्यान पोलीस उप निरीक्षक दिपक जाधव व पोलीस उप निरीक्षक बिनवडे, असे शिवाजीनगर पोलीस ठाणेचे हद्दीत नाईट राऊंड अधिकारी म्हणून कर्तव्यावर असताना पहाटे ०४/१५ वा चे दरम्यान सेलो इमारतीच्या समोर एफ सी रोड शिवाजीनगर पुणे येथून पेट्रोलिंग करीत असताना मेडीकल हाऊस या बंद दुकानातून धुर येत असल्याचे दिसल्याने तात्काळ त्यांनी मॉडर्न मार्शल व शिवाजीनगर मार्शलवरील कर्मचारी पोशि/कदम, लोंढे, शेवरे, शेंडकर, खैरनार यांच्यात समन्वय साधून दुकानाचे मालक नामे अनिल राठी यांना बोलावून अग्नीशामक दलास सदर ठिकाणी बोलावून तात्काळ आग विझवून घेतली.

वेळेत आग विझवल्याने मोठी दुर्घटना टळून दुकानाचे किरकोळ नुकसान झाले असून सदर आग वेळेत विझवल्याने कोणतीही जिवीत हाणी झालेली नाही.

तरी सदर बाबत आम्ही वपोनि श्री. बाळासाहेब कोपनर सो यांचे मार्गदर्शनाखाली केले असता, आम्हांस, पोलीस उप निरीक्षक बिनवडे, पोशि/कदम, लोंढे, शेवरे, शेंडकर, खैरनार यांनी मदत केल्याने याचे मदतीने आम्ही चांगले काम केले आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे